

आंबेडकरवादी

# अण्णा भाऊ साठे

डॉ. ज्ञानराजा चिघळीकर

# आंबेडकरवादी अण्णा भाऊ साठे

लेखक
डॉ. ज्ञानराजा चिघळीकर
(सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग)
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

रुपी पब्लिकेशन्स प्रा. लि., गडहिंग्लज

आंबेडकरवादी अण्णा भाऊ साठे
(Ambedkarvadi Annabhau Sathe)
**लेखक** : डॉ. ज्ञानराजा चिघळीकर
© प्रकाशक व लेखक

**आवृत्ती :** प्रथम आवृत्ती: १ ऑगस्ट २०२२ (अण्णा भाऊ साठे जयंती)
द्वितीय आवृत्ती: १४ एप्रिल २०२५ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती)

**ISBN Number :** 978-93-94710-00-9

**प्रकाशक :** रूपी पब्लिकेशन्स प्रा. लि.
'समता' ३८५/४२ मोर्डी कॉलनी, काळभैरी रोड,
गडहिंग्लज जि. कोल्हापूर.
Email: rupipublications@gmail.com
मोबाईल: ९८२२६५१३७७

**मुद्रक :** सेल्फ हेल्प एंटरप्रायझेस, धायरी, पुणे.

**अक्षरजुळणी :** श्री. प्रविण बा. साळुंखे.
ज्ञानज्योत प्रोडक्शन, कोल्हापूर मो.बा. ९५९४३००१११.

**मूल्य** : रु ५५/-

सदर पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनाने फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या पुस्तकातील सर्व मतमतांतरे लेखकांची आहेत. त्यास प्रकाशक जबाबदार राहणार नाही.

''कोणत्याही महामानवाचे व्यक्तिमत्व आणि कार्य हे बहुआयामी असल्याने कोणत्याही दोन अभ्यासकांमध्ये त्याबद्दल एकमत असत नाही. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संदर्भातही कांहीसे असेच कांही घडले आहे, घडत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे आयु. उत्तम कांबळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे कसे डाव्या विचाराचे साहित्यिक होते, हे त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्याच विचारांच्या आधारे स्पष्ट करण्याचा जसा प्रयत्न केलाय. त्याचप्रमाणे प्रा. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी तर आपल्या लेखणीतून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याच्या आधारेच ते कसे आंबेडकरवादी होते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केलाय, त्यावर अधिक चर्चा होण्याची गरज आहे.''

– प्रा. गौतमीपुत्र कांबळे

(फुले आंबेडकरी विचारधारेतील त्रैमासिक सेक्युलर व्हिजन जाने-सप्टेंबर २०२० लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी विशेषांकाच्या संपादकीय मधून साभार)

मूल्य : रु.५५/-

ISBN 978-93-94710-00-9

RUPI PUBLICATIONS PVT. LTD.

रुपी पब्लिकेशन्स प्रा. लि., गडहिंग्लज

9 789394 710009

गावच्या नकाशांनी नमूद करून केवळ सरकारच्या मदतीशिवाय पाण्याचा मार्ग दाखविणाऱ्या पाणड्यासह विहिरी खोदून, बांधून काढणाऱ्या शुद्र शेतकऱ्यास लहान मोठी बक्षिसे सरकारातून देण्याची वहिवाट घालावी." (महात्मा फुले समग्र वाङ्मय, सुधारित सहावी आवृत्ती नोव्हेंबर २००६ पान न. ३३३)

लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर आपल्या संस्थानातील जलसिंचन व पाणीपुरवठा सुविधांचा आढावा घेतला. नोव्हेंबर १९०९ मध्ये भोगावती नदीवर राधानगरी धरणाच्या बांधकामाचा शुभारंभ लक्ष्मीबाई राणीसाहेब यांच्या हस्ते केला. आपल्या अनेक पत्रातून ते म्हणतात कि 'My Life work will have been done when I complete this project."(महाराष्ट्र राज्य गॅझेटियर कोल्हापूर जिल्हा मराठी आवृत्ती सुधारित १९८९ पान न. १०६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तर पाण्यासाठी संघर्ष करावा लागला. २० मार्च १९२७ रोजी त्यांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. भारतीय संविधानाचा आराखडा घटना समितीसमोर सादर करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीत असावा अशी भूमिका घेतली. भारतीय संवाधानात "कलम २६२ (१) संसदेला कायद्याद्वारे कोणत्याही आंतरराज्यीय नदीच्या किंवा नदी खोऱ्यातील पाण्याचा वापर, वाटप किंवा त्यावरील नियंत्रण याबाबतच्या कोणत्साही तंट्याच्या किंवा तक्रारीच्या अभिनिर्णयाकरता तरतूद करता येईल." या कलमामुळे केंद्र सरकारला पाण्यासंबंधी कायदे करण्याचे अधिकार मिळाले. आंतरराज्य जलविवाद कायदा, नदीखोरे प्राधिकरण कायदा १९५६ मध्ये पारित करण्यात आला. तसेच भारतीय संविधान भाग चार मुलभूत कर्तव्ये "कलम ५१ क. च्या छ. वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे,